# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ४ था मंगळवार दि.०१ जुलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

मुंबई : प्रतिनिधी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सोमवारच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या सादर केल्या. या मागण्यांवर पुढील आठवड्यात ७ आणि ८ जुलै रोजी चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील. सन २०२५-२६च्या पुरवणी मागणीत येत्या दोन वर्षात नाशिकमध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणी खर्चासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आज सादर झालेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी रुपयांच्या मागण्या या अनिवार्य खर्चाच्या तर ३४ हजार ६६१ कोटीच्या मागण्या या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आहेत. केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने ३ हजार ६६४ कोटीची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून महापालिका, जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करून दिला आहे. पंधराव्या वित्त आयोगाने शिफारस केल्यानुसार ग्रामविकास आणि नगरविकास विभागाला ११ हजार ४२ कोटी रुपयांची अनुदाने दिली जाणार आहेत. तसेच नागरी पायाभूत विकास निधीच्या योजनेंतर्गत महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतींना १ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अधिभार परतावा म्हणून ३ हजार २२८ कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत आहे. केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ९८९ कोटी, मुंबई मेट्रो प्रकल्प, वाहतूक दळणवळण भुयारी मार्ग बांधण्यासाठी राज्य सरकारच्या हिश्श्याची दुय्यम कर्जाची रक्कम म्हणून २ हजार २४० कोटी रुपयांच्या निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून राज्य सरकारमार्फत सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोन म्हणून २ हजार १८२ कोटींची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून राज्यांना भांडवली खर्चासाठी ५० वर्षकरिता बिनव्याजी विशेष सहाय्य दिले जाते. या योजनेच्या अंतर्गत सरकारने २ हजार १५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत.

अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे तसेच पूर्ण सिंचन प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी नाबार्डकडून मिळालेल्या २ हजार ९६ कोटीच्या कर्जाची तरतूद पुरवणी मागणीत दाखवण्यात आली आहे. जिल्हा मार्ग, रस्ते आणि पुलांच्या कामासाठी दोन हजार कोटी रुपये, सामाजिक न्याय विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी अनुक्रमे २ हजार कोटी, १ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इतर मागास आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिक आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी १ हजार ३०० कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या सवलत मूल्यांची प्रतिपूर्ती म्हणून हजार कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. एस टी महामंडळासाठी १ हजार बारा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मंत्र्यांना आयपॅड वाटण्यासाठी दिड कोटी रुपयांची, दूध उत्पादक शेतक-यांना सात रुपये प्रमाणे अनुदान देण्यासाठी ४६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.



ठळक तरतूदी

- मुंबईतील मेट्रो साठी घेतलेल्या बा कर्ज आणि त्यावरील व्याज देण्यासाठी १५०० कोटी
- नगर परिषद विशेष अनुदान १५०० कोटी
- मुंबईतील मेट्रोच्या प्रकल्पासाठी घेतलेल्या दुय्यम कर्जासाठी १७४० कोटी
- एमएमआरडीयला ५०० कोटी(ठाणे बोरीवली आणि ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह परिसर भुयारी मार्ग )
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नागरी पायाभूत सोयीसुविधांसाठी १५०० कोटी
- राज्यातील राज्य महामार्गाच्या चालू असलेल्या व नवीन बांधकामासाठी आस्थापना खर्च आणि हत्यारे व सयंत्रे यावरील खर्चासाठी १००० कोटी
- राज्यातील रस्ते व पुले यासाठी साडेसहाहजार कोटी
- रेवस रेड्डी सागरी महामार्गाच्या विकासासाठी ५०० कोटी
- अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १४०० कोटी रुपये
- वाईन उद्योगाला प्रोत्साहन आणि अर्थसहाय्य देण्यासाठी ३४ कोटी रुपयांची तरतूद
- जिल्हा परिषदांच्या विवीध थकीत शुल्काच्या अनुदानासाठी १४०० कोटी
- अनुसूचित जातीसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी १०० कोटी
- राज्यातील बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेसाठी १०० कोटी रुपये
- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी पंधराशे कोटी
- राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी ३४५८ कोटी
- आशा स्वयंसेविका आणि प्रवर्तकांसाठी ६६७ कोटी रुपये
- आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका खरेदीसाठी २०० कोटी आणि आधी असलेल्या रुग्नवाहीकेच्या खर्चासाठी १०० कोटी
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सक्षमीकरणासाठी २०० कोटी रुपये
- सहकारी साखर कारखान्यांच्या मार्जिन मनी लोनसाठी २१८२ कोटी
- अंगणवाडी कर्मचा-यांच्या वेतनासाठी बाराशे सत्तावीस कोटी

पुरवणी मागणीतील विभागनिहाय तरतुदी

नगरविकास १५ हजार ४६५ कोटी

सार्वजनिक बांधकाम . ९ हजार ६८ कोटी

ग्रामविकास.. ४ हजार ७३३ कोटी

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य. ३ हजार ७९८ कोटी

सहकार, पणन, वस्त्रोद्योग २ हजार ८३५ कोटी

महिला आणि बालविकास. २ हजार ६६५ कोटी

जलसंपदा. २ हजार ६६३ कोटी

गृह .. १ हजार ४६१ कोटी

विधी आणि न्याय. १ हजार ३५३ कोटी

## 'हा मुल्ला मौलवींचा नमाजवाद' ; 'इंडिया' आघाडीवर सुधांशू त्रिवेदी संतापले

भाजप खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी 'इंडिया' आघाडीवर निशाणा साधला आहे. त्रिवेदी यांनी नुकतेच तेजस्वी यादव यांनी वक्फ सुधारणा कायद्यावरील विधानावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. सुधांशु त्रिवेदी यांनी,बाबा साहेबांच्या संविधानाची खिल्ली उडवली जात आहे. हा राम मनोहर लोहिया, जयप्रकाश यांचा समाजवाद होता का? भाजप आणि जेडीयू समाजवादाच्या बाजूने उभे आहेत. आरजेडी आणि सपा सारखे पक्ष नमाजवादाच्या बाजूने उभे आहेत. जर त्यांचे सरकार आले तर ते शरिया लागू करतील. हे लोक दहशतवाद्यांना संरक्षण देणार आहेत. असे म्हणाले आहेत.

काँग्रेस सरकारने शरियाला संविधानापेक्षा वर ठेवले होते. याद्वारे ते मागास दलित, वंचित आणि शोषितांचे आरक्षण खाऊ इच्छितात. एएमयू, जामियामध्ये एससी एसटी ओबीसीचे आरक्षण रद्द करण्यात आले. जम्मू आणि काश्मीरमध्ये कलम ३७० लागू करून एससी, एसटी, ओबीसीचे आरक्षण रद्द करण्यात आले. हे पक्ष मागच्या दाराने आरक्षण तोडण्याचे काम करत आहेत.

## तर मी पायही छाटेन; राज ठाकरेंचा जुना व्हिडिओ शेअर करत संदीप देशपांडे म्हणाले

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला गेल्या काही दिवसांपासून तीव्र विरोध होत होता. राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निर्णय रद्द करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला होता.

या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन्ही शासन निर्णय (जीआर) रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत करत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांचे अभिनंदन केले. तसेच राज ठाकरेंच्या भाषणाचा एक जुना व्हिडिओ देखील शेअर केला आहे. राज्य सरकारने निर्णय रद्द केल्यानंतर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी राज ठाकरेंचं अभिनंदन करणारी एक पोस्ट केली. राज ठाकरे यांचा एक जुना व्हिडीओही संदीप देशपांडेंनी शेअर केला. हा व्हिडीओ शेअर करत ते म्हणाले, साहेब, तुम्ही जे म्हणता तेच करता, मनापासून अभिनंदन. राज ठाकरे व्हिडीओमध्ये काय म्हणाले ? राज ठाकरे हा स्वत:साठी किंवा पक्षासाठी नाही. मराठी माणसासाठी म्हणून कोणाचेही पाय चाटेन. कोणाचेही पाय चाटेन मी मराठी माणसासाठी, पण मुंबई महाराष्ट्रापासून स्वतंत्र करण्याचा जर डाव घेतला तुम्ही हातामध्ये, तर मी पायही छाटेन, राज ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले. साहेब तुम्ही जे म्हणता तेच करता .मनापासून 'अभिनंदन समितीच्या अहवालानंतर पुढील धोरण ठरवले जाणार हिंदी सक्तीच्या निर्णयात बदल करताना सरकारने अप्रत्यक्षपणे तिसरी भाषा हिंदी राहील अशा पद्धतीने निर्णय घेतला. त्यानंतर याविरोधात तीव्र पडसाद उमटण्यास सुरूवात झाली होती. पण, त्यापूर्वीच सरकारने त्रिभाषा सूत्र संदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द केले. तसेच, या विषयावर सविस्तर अभ्यास करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात येणार असून, या समितीच्या अहवालानंतरच पुढील धोरण ठरवले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

# आ. कराड यांच्या प्रयत्नातून लातूर - कळंब रस्ता डांबरीकरणासह सुरळीत; नागरिकाकडून समाधान





लातूर :- लातूर येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील गायब झालेल्या लातूर ते कळंब हा राज्यमार्ग रस्ता लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे खुला झाला असून या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण होऊन वाहनधारकांना प्रवासासाठी सुरू झाल्याने कळंब रस्त्यावरील अनेक गावच्या नागरिकांनी समाधान व्यक्त करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

पूर्वीच्या काळात लातूर येथील जुन्या एमआयडीसी परिसरातून जाणारा लातूर ते कळंब २३६ हा राज्यमार्ग एमआयडीसी सुरू होण्यापूर्वी होता एमआयडीसी अस्तित्वात आल्यानंतर उद्योजकांना जागेचे वाटप झाल्यानंतर सदरचा अस्तित्वात असलेला रस्ता गायब झाल्याने वाहनधारकांना एमआयडीसीतील विविध पर्यायी रस्त्याचा आधार घेऊन प्रवास करावा लागत असे.

कळंब रस्त्यावरील दूरवरचा प्रवास करणाऱ्यासह लातूर तालुक्यामधील विविध गावच्या नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी एमआयडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन लोप पावलेला रस्ता खुला करून घेण्याच्या आणि रस्त्याचे काम करण्याच्या सूचना केल्या होत्या. आ. कराड यांच्या सूचनेनुसार एमआयडीसी यांच्याकडून नाहरकत घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पीव्हीआर चौक ते टिना ऑइल मिल चौक आणि पुढे कीर्ती ऑइल मिल चौक दरम्यानच्या रस्त्याची सरळ जोडणी करून या रस्त्याचे हॉट मिक्स डांबरीकरण केले.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर - कळंब रस्त्यावर लातूर शहरानजीक असलेल्या रेल्वे क्रॉसिंगवर सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मोठा पूल मंजूर करून त्यासाठी निधीही उपलब्ध करून घेतला आहे सदर पुलाची टेंडर प्रक्रिया सुरू आहे.

आमदार झाल्यानंतर वाहनधारकासह सर्वसामान्याची अडचण लक्षात घेऊन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर कळंब राज्य रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून रस्त्यावरील विविध गावच्या वाहनधारकांना दळणवळणाची सोय सुरळीत करून दिल्याने समाधान व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांचे अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# शासनाने लाखो रुपये खर्चून बांधलेली इमारत पडली धुळखात-लखन हजारे तात्काळ इमारतीचे उद्घाटन करण्यात यावे अन्यथा दलित चळवळीच्या वतीने उद्घाटन करण्यात येईल-रोहित कसबे

केज/प्रतिनिधी केज पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी आणि सभापती,उपसभापती यांच्यासाठी निवासस्थाने म्हणून दोन बिल्डिंग केज शहरांमध्ये उभारण्यात आलेल्या आहेत. शासनाने लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या इमारती या धुळखात पडलेल्या आहेत जर तात्काळ इमारतीचे उद्घाटन करून अधिकारी कर्मचारी यांना सदर निवस्थान हे स्थलांतरित न केल्यास दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या वतीने पँथर स्टाईलने इमारतीचे उद्घाटन करून शहरातील बेघर व दलित समाजाच्या कुटुंबांना राहण्यासाठी घर म्हणून देण्यात येईल अशा आशयाचे लेखी निवेदन दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या वतीने गट विकास अधिकारी केज यांना देण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहराच्या मध्यवर्ती भागात केज पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी व सभापती उपसभापती यांच्यासाठी शासनाने लाखो रुपये खर्चून दोन मोठ मोठ्या बिल्डिंग उभारल्या आहेत. मागील जवळपास तीन वर्षपूर्वी सदर इमारतीचे बांधकाम हे पूर्ण झालेले आहे तरी सदर निवासस्थान हे अधिकारी कर्मचारी यांना राहण्यासाठी हस्तांतरित करण्यात आलेले नाही. शासनाने लाखो रुपये खर्च करून भव्य अशा सुंदर इमारती उभारल्या आहेत परंतु सदर इमारतीचे उद्घाटन करण्या अभावी इमारती धुळखात पडल्या आहेत. सदर निवासस्थाने हे कर्मचारी अधिकारी यांना राहण्यासाठी शासनाने बांधलेले आहेत परंतु त्याचा लाभ हा अधिकारी कर्मचारी यांना न मिळता त्या ठिकाणी शहरातील व्यसनाधीन झालेले तरुण हे तेथे विविध प्रकारच्या नशा पान करत आहेत, त्या ठिकाणी जुगारही खेळला जात आहे तसेच सदर ठिकाणी हे शहरातील रोड रोमिओ साठी एक प्रकारचा अड्डा बनलेले आहे.



तसेच या टवाळखुरामुळे इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान ही झाले आहे आत्ता तरी शासनाने जागे होऊन तात्काळ इमारतीचे उद्घाटन करावे असे लेखी निवेदनात म्हटले आहे. जर प्रशासनाने तात्काळ आठ दिवसाच्या अगोदर इमारतीचे उद्घाटन न केल्यास केज शहरातील बेघर व दलित समाजाच्या कुटुंबाकडून इमारतीचे उद्घाटन केले जाईल व त्या आशयाचे आंदोलन करण्यात येईल त्याचबरोबर सदर निवासस्थान हे शहरातील बेघर व दलित समाजाच्या कुटुंबीयांना राहण्यासाठी निवासस्थान म्हणून खुले केले जाईल असा प्रशासनाला इशारा दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीने निवेदनाच्या माध्यमातून दिलेला आहे. माध्यमांशी बोलताना लखन हजारे व रोहित कसबे म्हणाले की, शासनाने लाखो रुपये खर्चून अधिकारी व कर्मचारी यांच्या व त्यांच्या कुटुंबाला राहण्यासाठी भव्य दिव्य अशी इमारत बांधलेली आहे. परंतु सदर इमारतीचे उद्घाटन करण्याअभावी सदर इमारत ही धुळखात पडलेली आहे शासनाचे लाखो रुपये हे पाण्यात गेले आहेत आता तरी प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तात्काळ इमारतीचे उद्घाटन करण्यात यावे अन्यथा पँथर स्टाईलने आम्ही सदर इमारतीचे उद्घाटन करून शहरातील बेघर असलेल्या दलित बांधवांना सदर इमारतीत राहण्यासाठी घरे म्हणून इमारत खुली करून देणार आहोत. सदर मागणीचे निवेदन सहाय्यक गट विकास अधिकारी अभिमान राठोड यांनी स्वीकारले आहे. या लेखी निवेदनावर रोहित कसबे, लखन हजारे,अशोक गायकवाड, प्रवीण मस्के,योगेश गायकवाड, शरद धीवार,निलेश साखरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## नेपाळमधील नवे संकट

नेपाळमध्ये देशांतर्गत कलह आणि राजकीय रस्सीखेचीने गंभीर रूप धारण केले आहे. नेपाळमधील हिंदू संस्कृती बाह्य शक्तींच्या रडारवर आहे. अलीकडच्या काळात ख्रिश्चन समुदायाची लॉबी दबाव आणत असून पैशाच्या बळावर राजकारण केले जात आहे. दुसरीकडे मुस्लीम समुदायाची लोकसंख्या अचानक वाढताना दिसत आहे. रोहिंग्या समुदायातील नागरिक काठमांडू शहरातही वावरताना दिसतात. या गोष्टी धर्मनिरपेक्षतेच्या नावावर होत असल्या, तरी यापैकी काही गोष्टींकडे राजकीय लाभ म्हणूनही पाहता येईल.

मागील काही काळापासून नेपाळमधील राजकीय चढ–उतार पाहता सर्वसामान्य नागरिक हतबल आणि स्तब्ध झाला आहे. २००८ नंतर नेपाळने १३ पंतप्रधान पाहिले. एकार्थाने या पदाला संगीत खुर्चीचे रूप आले आहे. या पार्श्वभूमीवर गेल्यावर्षी स्थापन झालेले ओली सरकार नेपाळमधील अस्थिरता आणि अस्वस्था दूर करेल, असे वाटत होते; परंतु समस्या कमी झालेल्या नाहीत. राजकीय अस्थिरतेमुळे नेपाळच्या विकासाला खिळ बसली आहेच शिवाय पर्यटन व्यवसाय देखील अडचणीत आला आहे. नेपाळमधील नेतृत्वात राजकीय कौशल्य आणि दूरदृष्टीचा अभाव असल्याने देशाला विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. नेपाळमध्ये देशांतर्गत कलह आणि राजकीय रस्सीखेचने गंभीर रूप धारण केले आहे. नेपाळमधील हिंदू संस्कृती बाह्य शक्तीच्या रडारवर आहे. अलीकडच्या काळात ख्रिश्चन समुदायाची लॉबी दबाव आणत असून पैशाच्या बळावर राजकारण केले जात आहे. दुसरीकडे मुस्लीम समुदायाची लोकसंख्या अचानक वाढताना दिसत आहे.


तीन दशकांपूर्वी मुस्लीम समुदायाची लोकसंख्या एक टक्क्यांपेक्षा कमी होती आणि आज पाच टक्क्यांपेक्षा अधिक दिसून येते. रोहिंग्या समुदायातील नागरिक काठमांडू शहरातही वावरताना दिसतात. या गोष्टी धर्मनिरपेक्षतेच्या नावावर होत आहेत आणि यापैकी काही गोष्टींकडे राजकीय लाभ म्हणूनही पाहता येईल. नेपाळमधील बदलत्या स्थितीमुळे सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक आधार कमकुवत होत आहे. त्याचवेळी राजकीय आणि आर्थिक संकटदेखील गडद होताना दिसत आहे. नेपाळची आजघडीची स्थिती पाहिली, तर हिंदू संस्कृतीचा पाया मजबूत केल्याशिवाय स्थानिक समस्यांचा निपटारा होऊ शकत नाही, हे कळून चुकते. जनआंदोलनाचे कधीकाळी नायक राहिलेले प्रचंड यांनी नेपाळमध्ये राजेशाहीला तिलांजली देत माओवादी व्यवस्था आणण्यात मोलाची भूमिका बजावली.

त्यांचे शब्द आणि भूमिकादेखील सनातन संस्कृतीचा पुरस्कार करत होते. हीच संस्कृती भारत आणि नेपाळला एकत्र आणण्याचे आणि जोडण्याचे काम करते. भारत आणि नेपाळ यांच्यासारखे संबंध जगभरात अन्य कोणत्याही दोन देशांत पाहावयास मिळणार नाही. त्यामुळे नेपाळमध्ये घडणार्या घडामोडींचा भारतावर सतत अप्रत्यक्षपणे परिणाम झालेला दिसून येतो. नेपाळच्या संस्कृतीचा र्हास हा मुस्लीम समुदायांकडून पसरविला जाणारा फुटिरतावाद आणि ख्रिश्चन समुदायाच्या वाढत्या प्रसारामुळे होत आहे. नेपाळमध्ये ख्रिश्चन समुदायाचा दबदबा गेल्या काही दशकांपासून वाढत असून यात उल्लेखनीय वाढ झाली आहे.

याचा नेपाळच्या समाज आणि राजकारणावर परिणाम होत आहे. नेपाळच्या २०२१ च्या जनगणनेनुसार, ख्रिश्चन समुदायाची लोकसंख्या एकूण संख्येच्या १.७६ टक्के असून ती ५ लाख १२ हजार ३१३ आहे. ही संख्या प्रारंभी खूप वाटत नाही; मात्र त्याचा वाढीचा दर अधिक आहे. हे आश्चर्यकारक असण्याबरोबरच बदलत्या सामाजिक स्थितीचे चित्रही सांगणारे आहे.

# जागरण : एक ध्येयवेडा कलंदर भारत सातपुते

भारत सातपुते फाटलेल्या आभाळाला ठिगळे जोडण्याच्या त्यांच्या आटोकाट प्रयत्नाला प्रथमतः सलाम. फेसबुक वरून त्यांची आमची ओळख झाली. त्यांनी जागरण नावाची स्वकर्तृत्वावर आधारलेली, आत्मकथनात्मक, शैक्षणिक व्यवस्थेचे वाभाडे वेशीवर टांगणारी कादंबरी 'जागरण' मला पाठविली. वाचत असताना पानापानावर विस्फोटक, पण वास्तव प्रसंगाचे त्यांचे वर्णन वाचून खुप अंतर्मुख झालो. श्रीराम दुर्गे यांचं 'जागल्या' नावाच्या पुस्तकांचं ही सतत जाणिव करून देत होतं हे पुस्तक. त्यांनी आतापर्यंत अनेक विविध विषयावर लेखन केलेले आहे. आपल्या मनोगतात लेखक म्हणतात.. बरे बोलण्यापेक्षा खरे बोलण्याचा माझा स्वभाव आहे. स्वच्छ, शुद्ध, प्रामाणिक जगण्याच्या नादात खडे, अळ्या, व घाण जे जे हे नष्ट करून पारदर्शक जीवन जगण्याचा निश्चय केला. जे चुकीचे आहे त्याला चूक म्हणण्याचे धाडस या जागरण मध्ये केले आहे. तर जे सुगंधी, सुंदर, अगाध आहे ते ते मोठ्या मनाने आदर्श म्हणून स्वीकारले आहे. संसार, शेती, यापेक्षाही शिकवण्यात आणि लेखनात जीव जास्त गुंतवला. पुरोगामीपणा, क्रांती, परिवर्तन, प्रबोधन हे केवळ शब्दातून, भाषणातून होत नाही तर ते आचरणातून होते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. नोकरशाहीने प्रामाणिक जगण्याचा प्रयत्न केल्यास कितीही संकटे आले तरी देश समृद्ध होईल असा लेखकांचा ठाम विश्वास आहे. सत्याच्या मार्गाने चालताना काटेही खूप भोगावे लागतात. टोकाचा प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न केला तर लेखकावर विनयभंगासारखे खोटे गुन्हेही दाखल होत होते. शेतातल्या पिकांची पाच सहा महिन्यात फळे लागतात, झाडांची फळे दहा वर्षात बघायला मिळतात, पण शिक्षणाची फळे अनुभवण्यासाठी ५० १०० वर्षे वाट बघावी लागते . सातपुते म्हणतात... देशाला परकियापासून धोका आहे असे म्हणण्यापेक्षा देशाला खरा धोका देशातल्याच अतिरेकी प्रवृत्ती पासून आहे. शिक्षणाधिकाऱ्यांशी पंगा–– नोकरीला लागून जमतेम एक वर्ष झाले होते. कुटुंब नियोजनाच्या केसेस करा महणून शिक्षकांच्या पाठीमागे तगादा लावला होता. शिक्षणाधिकार्याने लेखकास विचारले तुम्ही किती केसेस केल्या? तेंव्हा लेखक सातपुते म्हणतात माझ्या नवीन पुस्तकाचे काम चालू आहे, अभ्यासही चालू आहे,केसेस करण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत. तेव्हा शिक्षणाधिकारी म्हणतात ते अभ्यास, ते पुस्तके जळू द्या, ते महत्त्वाचे नाही, मी केसेस करा म्हणून मराठीत सांगतोय, ती भाषा तुम्हाला कळत नाही काय? पुस्तके जळू द्या, हे अधिकाऱ्याचे बोलणे लेखकाला खूप अपमानास्पद वाटल्याने सातपुते ही म्हणाले... तुम्ही 'भाषा जरा चांगली आणि सभ्य वापरा' शिक्षणाबद्दल बोला, गुराख्या सारखे काय बोलायलाव ? शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांना पुन्हा 'बेशरम' म्हटले.. तेव्हा लेखकही त्यांच्या अंगावर धावून गेले इतरांनी मध्यस्थी केल्याने प्रसंग टाळला. शाळेतील परीक्षा कडक व्हाव्यात, कॉपी होऊ नये, खोटे गुण घेणारे आयुष्यात यशस्वी होत नाहीत, स्पर्धेत टिकत नाहीत यावर त्यांचा विश्वास होता. शिक्षक एकत्र जमले की, शिक्षणावर कमी बोलणार शेत, पीक पाणी, राजकारण, पक्ष, गावातील भांडणे यावर तासंतास बोलायचे. कोणी नागरिक आला तर पान, तंबाखू खायचे ह्या प्रवृत्ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याला थोडेफार यशही मिळाले. माजी आमदाराचे वस्तीगृह तपासणीत बोगस निघाले त्याची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली तर एका शिक्षिकेच्या माध्यमातून लेखकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. टीव्हीवर सतत बातम्या झळकत राहिल्या.याच दरम्यान जुगार खेळताना चार–पाच शिक्षक पकडल्या गेले पण त्याची साधी बातमीही नाही. एक वर्षासाठी लेखकाचे निलंबन झाले. लेखक म्हणतात आदर्श, चारित्र्य, तत्त्वे, माणुसकी ही मुल्ये पायदळी तुडवली गेली. शेवटी लेखक कोर्टात निर्दोष झाले तेव्हा एक त्यांचे मित्र डॉक्टर गेडाम म्हणतात तक्रारी दोन माणसाच्या नेहमी होतात, जे अजिबात काम करत नाहीत त्यांच्या व जे जास्त इमानदारीने काम करतात त्यांच्याही हे वाक्य लेखकासाठी शाबासकीच होती .




सर्व शिक्षा अभियान –– नोकरीच्या काळात फारच कमी शिक्षणाधिकारी प्रामाणिक वाटले. बहुतांश घोटाळे, चौकशीतच अडकलेले. काही अधिकारी जातीयवादी, काही नशा पाणी करून धिंगाणाही घालत होते. लेखकांनी त्यांची तक्रार केली तर त्यांना पदोन्नती मिळाली. 'उपसंचालक पदावर पदोन्नती' झाली या प्रवृत्तीमुळे शिक्षण खाते बदनाम झाले. असा शिक्षण विभागाचा कारभार चालत होता. एका शिक्षणाधिकाऱ्याच्या विरोधात तर नाव्ह्यांनी संप केला होता ही शोकांतिका नव्हे काय? डायट चे दोन प्राचार्य लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात अडकलेत त्यांनाही पदोन्नती मिळाली. लेखक म्हणतात एकदा जव्हार तालुक्यातील 'कोसबाडच्या टेकडीवर' (अनुताई वाघ यांचेही महत्वाचे पुस्तक आहे) शिक्षकांनी शैक्षणिक सहल काढली तर शिक्षकांनी स्वतःचीच मुले सहलीत घेतली व त्यांच्यावरच वैयक्तिक लक्ष देत होते. खरं म्हणजे सहलीमधून कधीतरी निसर्ग, समाज, इतिहास, भूगोल, विज्ञान, बोलीभाषा, संस्कृती, परंपरा, रीतीरीवाज, शिवार, शेती, धरणे, आदी मुलांना सहलीत अनुभवता येतात. सर्व जाती धर्माचा इतिहास, संस्कृती, मुले पाहतात, ट्रॅव्हल, एस. टी. यांचा मुलांना खूप आनंद मिळतो. सहली मुलांच्या आयुष्यात कायम स्मरणात राहतात. पाहिलेले अनुभवलेले विश्व हे टिकाऊ असते. आपल्या खुराड्याच्या बाहेर पडले तरच जग समजते .

संस्थाचालक –– संस्थाचालक हे जेव्हा वरिष्ठ शिक्षकाकडून संमती पत्र लिहून घेऊन स्वतःच्या मुलाला मुख्याध्यापक करतात (लायकी नसली तरी) लोकशाही नावाला तरी आहे काय? भाषणात 'साने' गुरुजी आणि वागण्यात 'नाणे' गुरुजीचे पीक जोमात आहे, आदर्श कोमात आहे. लेखक म्हणतात नोटासाठी इमान विकणार नाही. ध्येयवेडा शिक्षक (उउएठ्ढ) कडून मिळालेली पुस्तके अस्ताव्यस्त धुळखात पडलेली होती सातपुते सर बदलून आल्यानंतर ते पुस्तके त्यांनी व्यवस्थित कपाटात लावली. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावली, पण शिक्षकांनी पुस्तके वाचलीच नाहीत. शौचालय दुरुस्तीवर खर्च दाखवून शौचालय नादुरस्त असणे, स्टेशनरी पावत्या प्रमाणे साहित्य नसणे, शालेय पोषण आहाराच्या ताटल्या गहाळ असणे, फर्निचर व स्टॉकचा ताळमेळ नसणे, टी.सी., निर्गम उताऱ्याचे पैसे घेणे, त्यांची कीर्द नसणे, विद्यार्थी पट बोगस असणे, स्काऊट गाईड चालू नसणे, या सर्वांचा पाठपुरावा करून वरिष्ठाला अहवाल पाठवला व त्यांची खटिया खडी केली. निलंगा जिल्हा परिषद प्रशालेत कॉपी विरोधी कडक भूमिका घेतली. रस्टिकेट करण्याचे धाडस दाखवले. सर्वांच्या नजरेत लेखकाबद्दलची प्रतिमा कॉपी विरोधी अशी झाली. त्यांच्या नावापुढे कोणीतरी खोडसाळपणाने असे लिहिले. यह केंद्र मौत का कुवॉं है, वहा भारत सातपुते केंद्र संचालक है एवढी धास्ती विद्यार्थ्यांनी घेतली होती. पगाराशी बेईमानी करणार नाही ह्या त्यांच्या ध्येयावर ठाम राहिले.कॉपी करु देणारे विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्वस्त करणारे मारेकरीच म्हणावे लागतील, हा त्यांचा विश्वास होता. खिचडीच्या दुरावस्तेबद्दलही ठाम भूमिका घेतली. मिळणाऱ्या मुबलक पगाराचे थोडेफार ऋण फेडता आले पाहिजे. एक मॅडम त्यांच्या शाळेत रुजू होण्यासाठी आल्या, त्यांना साधा अर्जही लिहिता येत नव्हता. त्या आंबेजोगाई वरून जाणे येणे करत होत्या, मुलांच्या वह्या कधीच न तपासणे, शाळेत उशिरा येणे, राष्ट्रगीता साठी सावधान मध्ये उभे न राहणे, विद्यार्थ्यांची खोटी हजेरी भरणे, वर्गाकडे दुर्लक्ष करणे, पेपर तपासताना चुकीच्या उत्तराला बरोबर तर, बरोबरच्या उत्तराला चूक देणे, मॅडमच्या उत्तर पत्रिकेच्या गठ्ठ्याची पाहणी केली असता चुकीच्या उत्तरालाही गुण दिले. मॅडमला काही येत नव्हते हे वरील कारणावरून लेखकाचे ठाम मत झाले. (सत्तावीस डिसेंबर २०२४ ला साम टीव्हीवर बातमी झळकली होती... मराठवाड्यात आठ पैकी सहा जिल्ह्यातील २९ % विद्यार्थ्यांना मराठी वाचता येत नाही) मॅडमच्या वैयक्तिक व्यवहाराच्या तक्रारी लोकं शाळेत येऊन करायचे. वरिष्ठ बोलले तर 'आत्महत्या करते' अशा धमक्याही द्यायच्या. माणूस चुकीचा पुतळा असतो पण मॅडम तर चुकांचा महासागर होत्या. त्या शाळेत अतिशय बेरकी असणारे स्वैर वागणारे नाना नावाचे शिक्षक होते त्याला आळा घालण्यासाठी शिस्त लावण्याचा प्रयत्न केल्याने या मॅडमला हाताशी धरुन (मुख्याध्यापकाने शरीरसुखाची मागणी केली)असा सातपुते वर खोटा गुन्हा दाखल केला. जिल्ह्यात कोणीही मंत्री, आमदार, खासदार किंवा अधिकारी आल्यावर त्यांच्यासमोर या मॅडम खोटं खोटं रडून सातपुते वर निलंबनाची कारवाई करा म्हणून निवेदने द्यायच्या. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने दाखल झालेला गुन्हा रद्द केला. सत्य परेशान हो सकता है लेकिन पराजित नही याची प्रचिती आली. मॅडमच्या विरोधात शैक्षणिक हलगर्जीपणा व पेपर तपासणीच्या अक्षम्य चुकाच्या बाबतच्या अहवालावर कसलीच कार्यवाही झाली नाही. चार वर्षांनी मॅडमची तात्पुरती वेतन वाढ बंद केली. या सर्व अराजकाबाबतीत लढण्यात लेखकाने सर्व आयुष्य खर्ची घातले. पण स्वच्छ प्रतिमेचा सातपुते मुख्याध्यापक म्हणून परिसरात लौकिक प्राप्त झाला .

लेखक आपल्या तत्त्वावर अतिशय ठाम होते डि. लीट पदवीसाठी सरांची शिफारस केली त्यासाठी दीड लाखांची लाच मागितली. त्यांनी तो प्रस्ताव धुडकावला. निती मूल्यांना अंधारात घालणारी असली पदवी खड्ड्यात घाला. नोटा पुढे पदव्या एवढ्या स्वस्थ का होतात? सुट्टीविना शाळा–– हा उपक्रम राबवला दररोज १५, १५ तास राबलेत . शाळेच्या योग, व्यायाम, विविध उपक्रमाची दखल घेतली गेली. लेखकाला शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. ३५० दिवसांच्या रजा शिल्लक असतानाही साडेतीन दिवसही रजा घेण्याचा मोह त्यांना झाला नाही. एवढी त्यांनी व्यवसायावरची निष्ठा जपली.सरांच्या लातूरी बोलीभाषेचा गोडवा आत्मकथन वाचतांना प्रसन्नता लाभते . तुमच्या सोबत प्रत्येक शाळा फिरल्याचा पुस्तक वाचता, वाचतांना भास होत होता .'कोयता' कार सरदार जाधव यांचं मुखपृष्ठ अतिशय उत्तम साकारले आहे. एका तडाख्यात बाहेर पडणा–या ज्वाला उत्तमच . ३० एप्रिल २०२० ला नियत वयोमानानुसार सर सेवानिवृत्त झाले. त्यांना उत्तम आयू आरोग्य लाभो, उत्तमोत्तम साहित्य निर्मिती सरांच्या हातून घडो, अशी अपेक्षा व्यक्त करतो.सरांनी शिक्षणव्यवस्था निर्दोष असावी या साठी केलेला जिवापाड संघर्ष एकदा तरी वाचावाच असा वाचकाला आग्रह करतो.

––––––––––––

भास्कर गायकवाड (माजी प्राचार्य) व्याड, ता. रिसोड जि. वाशिम– ९७६३४२२५१८,
'जागरण' आत्मचरित्र
लेखक– भारत सातपुते
प्रकाशिका– सुषमा भारत सातपुते , गातेगावकर

# त्रिभाषा धोरणाचा जीआर काढणे आणि रद्द करणे हा तर सरकारचा राजकीय डाव!

हिंदी सक्तीच्या जीआर वरून असे लक्षात येते की याचा राजकारणावर काय परिणाम पडू शकतो किंवा याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला किती आणि कसा घेता येईल यावर सत्ताधाऱ्यांचे लक्ष असावे.त्याचप्रमाणे सरकारने हिंदी सक्तीचा जीआर आणताच विरोधीपक्ष एक्टीव्ह मोडमध्ये आला आणि विरोधकांची मोर्चेबांधणी सुरू झाली.याच निमित्ताने दोन्ही ठाकरे गट एकत्र आल्याचे पाहून आणि ५ जुलैला मोर्चा निघणार सोबतच संपूर्ण विरोधी पक्ष एकवटल्याचे पाहून आपल्या सरकारवर हिंदी भाषेच्या सक्तीचा विपरित परिणाम होऊ शकतो आणि महायुतीमध्ये सुध्दा यावर एकमत दिसत नसल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय हेतूने मराठी माणसाची फसवणूकच म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या ह्रुदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे. राज्यात गेल्या आठवड्यापासुन हिंदी व मराठी भाषेचा रणकंदन सुरू होते. परंतु मराठी माणूस एकवटल्याने सरकारला झुकावे लागले व हिंदी सक्तीचा जीआर सरकारला रद्द करावा लागला.परंतु यात सरकारकडुन राजकारण झाल्याचे अवश्य दिसून येईल.कारण राज्य सरकारने कोणाच्या तरी दबावाखाली हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय घेतला असावा असाही कयास लावला जात आहे.कारण राज्यात पुर्वी त्रिभाषीक पध्दत होती तीच योग्य होती ही बाब आता स्पष्ट दिसून येते. देशातील कोणतेही राज्य असो प्रथम प्राधान्य मातृभाषेलाच हवे. त्यानंतर राष्ट्रीय भाषा आणि त्यांच्या नंतर इंग्रजी किंवा इतर भाषेला प्राधान्य द्यायला हवे.आतापर्यंत मातृभाषा, राष्ट्र भाषा व नंतर इंग्रजी किंवा इतर भाषा असा क्रम पुर्वी पासुनच आहे आणि त्याचे महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्विकारले आहे.राज्यात हिंदी भाषेचा विरोध मुळातच नाही. परंतु राजकीय पुढारी राजकारणाला वेगळे वळण देण्यासाठी विद्यार्थ्यांना हिंदी भाषा वेळेच्या आधी सरकार लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.आज देशाची उपराजधानी व औद्योगिक राजधानी म्हणून मुंबई ओळख जगभर आहे ही बाब जगजाहीर आहे. परंतु परप्रांतीयांनी मुंबईमध्ये जनुकाय मराठी भाषेवर आक्रमक केले की काय असे वाटत आहे.कारण बॉलीवूड क्षेत्र आणि हायप्रोफाइल मध्ये वावरणारे जास्तीत जास्त लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात आणि परप्रांतीय लोक हिंदी भाषेचा वापर करून मराठी भाषेला डावलण्याचा प्रयत्न करतात.यामुळे याचा विपरीत परिणाम मराठी भाषेवर व मराठी माणसावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.पुर्वी पहिली ते चौथी पर्यंत हिंदी भाषेची सक्ती नव्हती. हिंदी विषय हा पाचवीपासून सुरू व्हायचा म्हणजेच मातृभाषा परीपक्व झाल्यानंतर हिंदी भाषेचा व इतर भाषेचा विचार केला जात असे.परंतु सरकार राज्यात पहिलीच्या वर्गापासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याचा प्रयत्न करीत होती.परंतु सरकारचा डाव फसला आणि याचा सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला झुकावे लागले व त्रिभाषा धोरणाचे दोन्ही जीआर रद्द करावे लागले.कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल.जर हिंदी पहिल्या वर्गापासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे. ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत ते बाजूला सारून नव्याने भाषा वाद निर्माण करून आणि त्याचा राज्यातील जनतेचा मोठ्या प्रमाणात विरोध पहाता हिंदी सक्तीचा जीआर रद्द करावा लागला.कारण राज्याच्या जनतेला सरकारने व्दीधेत टाकून ज्वलंत प्रश्नांवर सरकार पडदा टाकत आहे की काय असे चित्र दिसत होते. आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे ते अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल नकोच.या भाषा वादामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा जय विजय झाला नसुन फक्त मराठी माणसाचा विजय झाला आहे.जय महाराष्ट्र!

***********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# विमा एजंट: समाज हिताची जाण असलेला उद्योजक

श्री. आशिष सेठी, हेड – एजन्सी, हेल्थ डिस्ट्रीब्यूशन आणि ट्रॅव्हल, बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स भारत देश सध्या अशा एका वेगळ्या वळणावर उभा आहे. जिथे आर्थिक सुरक्षा व उद्योजकता एकमेकांना पूरक ठरत आहेत. जगातील सर्वात तरुण आणि सर्वात गतिशील मनुष्यबळ आपल्याकडे आहे आणि प्रत्येकजण अशा करिअरच्या शोधात आहे जिथे आर्थिक स्वातंत्र्य मिळते. व्यावसायिक विकास आणि हेतू साध्य होतो. अशी एक शक्तिशाली आणि मोठ्या लाभाची करिअर संधी म्हणजे विमा एजंट बनणे होय. पारंपारिक उद्योजक उपक्रम, ज्यामध्ये बऱ्यापैकी भांडवल गुंतवले जाते, असे न करता हे काम असा व्यवसाय उभारणीत मदत करते ज्यामध्ये लोकांच्या आयुष्यात खरा फरक निर्माण होतो. २०२५ मध्ये भारताचा जीडीपी अलीकडेच ४ ट्रिलियन मार्क पेक्षा जास्त असल्याची नोंद झाली आहे. देशाचा विकास झपाट्याने होत आहे आणि भविष्यकाळात जपान व जर्मनीला मागे सारून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीने पाऊल टाकत आहे अशा आर्थिक प्रगतीमुळे नैसर्गिकरित्या प्रति व्यक्ती उत्पन्नात वाढ होते, ज्यामुळे वेळेनुसार अधिक संपत्ती आणि मालमत्ता जमा करण्यास व्यक्तींना सक्षम बनवते.

या संदर्भात, या मालमत्तांचे संरक्षण करण्याची भूमिका केवळ व्यक्तींचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठीच नाही तर राष्ट्र–निर्माणात योगदान देण्यासाठीही सर्वोत्तम बनते. विमा एजंट केवळ पॉलिसी विकत नाही तर ते कुटुंबांना आर्थिक संरक्षण, व्यवसायात स्थिरता आणि कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस मनःशांती मिळेल यासाठी देखील प्रयत्न करतात. भारतासारख्या देशात जिथे विमासंबंधी मोठया प्रमाणात जागरूकता नाही, जिथे लाखो लोकांच्या आयुष्यात आर्थिक धक्के सुरूच असतात, त्याठिकाणी हा व्यवसाय करणे म्हणजे केवळ करिअर घडवणे नाही तर एक प्रकारचे मिशन साध्य करणे होय.

विमा एजंटची भूमिका आजच्या घडीला उपलब्ध असलेल्या सर्वात आकर्षक आणि परिपूर्ण करिअर मार्गांपैकी एक आहे. संरचित आणि सुस्थापित उद्योगाचा लाभ घेताना एजंट उद्योजकतेच्या लवचिकता आणि स्वातंत्र्यासह कार्य करतात. मोठ्या भांडवली गुंतवणूकीची आवश्यकता नाही आणि तरीही आर्थिक ध्येय बर्याप्रमाणात गाठले जाते. पॉलिसी विकून कमवलेले कमिशन केवळ एक वेळचे उत्पन्न नाही तर पॉलिसी नूतनीकरणाद्वारे दीर्घकालीन महसूल निर्मिती होऊ शकते. अनेक इंडस्ट्रीजमध्ये कमाई व्यवहारिक असते मात्र बहुतांश सर्वसाधारण विमा पॉलिसी वार्षिक आहेत, म्हणजे त्यांचे दरवर्षी नूतनीकरण करणे गरजेचे आहे. विमा एजंटसाठी, हे आवर्ती उत्पनाचा मार्ग तयार करते, जिथे आज विकलेली प्रत्येक पॉलिसी वर्षानुवर्षे महसूल निर्माण करत राहते. ग्राहक मिळवण्यासाठी केलेली धडपड एकदा केलेल्या विक्रीसह व्यर्थ जात नाही; त्याऐवजी, ती एक चक्रवाढ आर्थिक प्रवाह तयार करते, ज्यात शाश्वत कमाई आणि आर्थिक सुरक्षा सुनिश्चित होते.

विमा क्षेत्रात देखील डिजिटल युगाचा आरंभ झाल्यामुळे आजच्या घडीला विमा एजंट बनणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाले आहे. भारतीय विमा कंपन्यांनी तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे ग्राहकांपर्यंत डिजिटलपणे पोहोचणे, त्वरित पॉलिसी जारी करणे आणि वास्तविक वेळेत त्यांना सहाय्य करणे या गोष्टी आता सहज शक्य झाल्या आहेत. मोबाईल प, एआय–संचालित ग्राहक सेवा, डिजिटल पॉलिसी जारी करणे आणि विमा ट्रॅकिंग यामुळे एजंटच्या कामात अमुलाग्र बदल दिसून येत आहे. या उपयुक्त साधनांसह, एजंट आता एकाच वेळी एकाधिक ग्राहकांची मागणी पूर्ण करू शकतात, कागदरहित व्यवहार करू शकतात आणि प्रवासात असताना देखील वैयक्तिकृत उपाय सूचवू शकतात. या डिजिटल परिवर्तनामुळे कार्यात्मक अडथळे दूर झाले आहेत, ज्यामुळे एजंटला महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करता येते जसे की ग्राहकांशी चांगले संबंध निर्माण करणे आणि योग्य आर्थिक उपाय सुचविणे. तरीही, अशा प्रकारची तांत्रिक प्रगती होत असताना देखील विमा हा असा व्यवसाय आहे, जो आपापसातील संभाषण व विश्वास या घटकांवर अवलंबून आहे. अनेक वित्तीय उत्पादने ऑनलाईन घेतली जाऊ शकतात मात्र विमा प्रकारात अनेकदा मार्गदर्शनाची आवश्यकता असते. ग्राहक पॉलिसी खरेदी करण्यापूर्वी त्याबाबतची स्पष्टता, संरक्षणाचे लाभ, अपवाद या सर्व बाबी तपासून घेत असतो. आणि याचवेळी विमा एजंट मुख्य भूमिका बजावतो. वितरण हा विमा उद्योगाचा मेरुदंड आहे, ज्यामुळे लोकांना त्यांची आर्थिक जोखीम पूर्णपणे समजल्याची आणि पुरेसे संरक्षित असल्याची खात्री होते. एजंट जटिल पॉलिसी आणि वास्तविक जीवनाची आर्थिक सुरक्षा यादरम्यानचे अंतर कमी करतो, ज्यामुळे खरेदी प्रक्रिया अधिक सरळ, सहज वापरण्याजोगी आणि ग्राहकांना दिलासा देणारी ठरते.

वाढती अर्थव्यवस्था असूनही, भारतात विमासंबंधी जागरूकता कमीच आहे आणि जागतिक सरासरीपेक्षा विम्याचा प्रसार लक्षणीयरीत्या कमी आहे. जीवन विम्याचे प्रमाण जीडीपीच्या अंदाजे २.८% आहे, तर सर्वसाधारण विमा देखील कमी आहे म्हणजे जवळपास १%. भारतात ज्याप्रमाणात नैसर्गिक आपत्तीच्या घटना घडत आहेत त्यामुळे साहजिकच चिंतेचे वातावरण आहे. सन १९०० पासून, १९०० ते २००० दरम्यान ४०२ आपत्ती घटना आणि २००१ ते २०२२ दरम्यान ३६१ आपत्ती घटना घडल्या आहेत. या घटना अधिक वारंवार होत आहेत आणि त्यामुळे गंभीर आर्थिक ताण निर्माण होत आहे. विविध प्रकारच्या आपत्तींमध्ये, पूर परिस्थिती सर्वात सामान्य आहेत, ज्यामध्ये जवळपास ४१% सर्व घटनांचा समावेश होतो, त्यानंतर क्रम लागतो वादळाचा (स्त्रोत: ड्ढख ीशीशरीलह). याव्यतिरिक्त, अहवाल दर्शवितात की देशाचा ५९% भाग भूकंपासाठी असुरक्षित आहे. सध्याचेच उदाहरण घ्यायचे म्हटले तर दिल्लीतील ४ रिश्टर स्केलचा भूकंप (स्त्रोत: झखइ). हे अहवाल सामान्य जनता, पायाभूत सुविधा आणि संसाधनांसाठी गंभीर जोखीम अधोरेखित करतात.

हे संरक्षण अंतर केवळ समाजातील सर्वात असुरक्षित घटकापर्यंत आणि देशाच्या दुर्गम भागांपर्यंत आपली पोहोच वाढवून संबोधित केले जाऊ शकते. आपली लोकसंख्या सर्वसमावेशक विमा अंतर्गत संरक्षित असल्याची खात्री करून, आपण आपत्तींनंतर या समुदायांना महत्त्वाचे आर्थिक सहाय्य प्रदान करू शकतो, त्यांना त्यांचे आयुष्य पुन्हा उभे करण्यास आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करू शकतो. विमा या प्रकाराचा अवलंब करण्यासाठी, सरकारने आयुष्मान भारत, पीक विमा योजना आणि अपघात संरक्षित कार्यक्रम यासारख्या उपक्रमांची सुरुवात केली आहे. तरीही, विमा एजंट हा जनता आणि या आर्थिक सुरक्षा तरतुदी या दरम्यानचा खरा दुवा आहे. जोखीम संरक्षणाचे महत्त्व यावर व्यक्ती आणि व्यवसायांना शिक्षित करून आणि त्यांना योग्य पॉलिसी सुरक्षित करण्यास मदत करून देशाच्या आर्थिक लवचिकता मजबूत करण्यात एजंट महत्त्वाची भूमिका बजावतात. या व्यवसायाचे सौंदर्य ते जोपासत असलेल्या नातेसंबंधांमध्ये आहे. विमा खूपच वैयक्तिक बाब आहे, त्यासाठी व्यक्तीच्या विशिष्ट गरजा समजून घेणे, त्यांच्या पर्यायांवर शिक्षित करणे आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करणारे उपाय प्रदान करणे आवश्यक आहे. कालांतराने, एजंटचे काम विक्री पॉलिसीच्या पलीकडे विस्तारित होते; ते गरजेच्या वेळी विश्वसनीय सल्लागार, आर्थिक समस्या सोडवणारे आणि विश्वसनीय मार्गदर्शक बनतात. ग्राहकासोबत निर्मित विश्वासामुळे मजबूत व्यावसायिक संबंध, व्यवसायाची पुनरावृत्ती आणि दीर्घकालीन यश मिळते. विकली जाणारी प्रत्येक पॉलिसी केवळ व्यवहार नाही; हे व्यक्ती आणि कुटुंबांसाठी उज्वल भविष्य सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक सुरक्षा आणि वचनबद्धता दर्शविते.

आपले करिअर फायदेशीर व अर्थपूर्ण असावे अशी सर्वांची इच्छा असते, विमा एजंट बनल्यास या दोन्ही बाबी पूर्ण होतात. हे एक असे करिअर आहे ज्यामध्ये रोज नवनवीन लोकांशी संपर्क साधता येतो, त्यांना माहितीपूर्ण फायनान्शियल निर्णय घेण्यास आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करता येते. भारताच्या विस्तृत, अद्याप प्रकाशात न आलेल्या या क्षेत्रातील विकासाच्या संधी अतुलनीय आहेत. संकटाच्या क्षणांमध्ये विम्याचे महत्त्व सर्वाधिक कळून येते. जे लोक प्रभावित होतात, त्यांच्यासाठी जीवनवाहिनीचे कामच जणू विमा करत असते. नैसर्गिक आपत्ती, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा अपघातांमुळे विनाशकारी नुकसान होऊ शकते, परंतु विमा लोकांना त्यांचे आयुष्य पुन्हा निर्माण करण्यास मदत करण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य प्रदान करते. सरकारला या गोष्टीची जाण आहे आणि आपत्ती दरम्यान जलद दावा सेटलमेंटला सक्रियपणे प्रोत्साहन देते, विमाधारकांना वेळेवर सहाय्य प्राप्त होण्याची खात्री करते. ही उदाहरणे केवळ समाजात विम्याची महत्त्वाची भूमिका मजबूत करतात. हे घर, वाहने आणि व्यवसाय सारख्या आवश्यक मालमत्तेचे संरक्षण करते, आर्थिक तणावापासून पुनर्प्राप्ती सुलभ करते आणि मनःशांती प्रदान करते. विमा एजंट बनणे म्हणजे एक असा एक व्यवसाय निवडणे आहे, जो शाश्वत बदलाच्या निर्मितीच्या क्षमतेसह आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करतो. या उद्योगाचा विस्तार सध्या झपाट्याने होत आहे, आज जे यामध्ये सहभागी होणार आहेत, त्यांना स्वतःच्या आर्थिक लाभासह इतरांना त्यांच्या आर्थिक विवंचनेत केलेल्या मदतीचे समाधान देखील प्राप्त होईल.

सामाजिक प्रभावासह व्यावसायिक यश प्राप्त करणाऱ्या करिअरच्या शोधात असलेल्या कोणासाठी ही योग्य संधी आहे. हीच ती वेळ, अशा व्यवसायामध्ये उतरण्याची जिथे महत्त्वाकांक्षेला चालना दिली जाते, आर्थिक सुरक्षा निर्माण केली जाते आणि अर्थपूर्ण वारसा घडवला जाऊ शकतो. तुमच्या भविष्याची जबाबदारी घ्या आणि भारताच्या आर्थिक कल्याणास सुरक्षित करण्याच्या मिशनमध्ये सहभागी व्हा. आजच विमा एजंट बना!

# पँथरच्या मुशितला मानभावी माणूस: विठ्ठल भोसले

तब्बल २९ वर्षे शासकीय सेवेत असताना आणि नंतरही त्याच सचोटी,निःस्वार्थी भावाने बोगस जातीची प्रमाणपत्रे मिळवून आरक्षण लाटणार्या,शिक्षण संस्थांमध्ये बोगस तुकड्या निर्माण करुन शासनाला लुटणार्या,शिक्षण विभागातील स्थानिक ते मंत्रालयीन पातळीपर्यंत झालेली अनागोंदी या विरोधात ठाम निर्धारपूर्वक प्रकरणं धसास लावून शासन,कायद्याला मदत करत,आरक्षणाचे संरक्षण करण्याची भूमिका बजावणारे पँथरच्या मुशितील संविधानप्रेमी सेवानिवृत्त सहाय्यक प्रकल्प अधिकारी विठ्ठल महापूराव भोसले हे आज दि.१ जुलै २०२५ रोजी ७३ व्या वर्षात पदार्पण करत आहेत,त्यांच्या मानभावी सेवाकार्य आणि वाटचालीस मनापासून शुभेच्छा...

माणसं आपलं खाजगी जीवनाचं ध्येय ठरवून त्याप्रमाणे जीवनाची वाटचाल करतात.ते नोकरीत असतील तर नियत वयोमानंतर सेवानिवृत्त होवून आपलं घर,शेती,मुलंबाळं,नातवंड असला तर काही धंदा यात मशगुल होतात पण विठ्ठल भोसले याला अपवाद आहेत,म्हणून त्यांच्या जीवन कार्याचा हा आढावा देणे क्रमप्राप्त वाटते.

निलंगा तालुक्यातील भूतमुगळी येथील राहिबाई आणि महापूरराव या दाम्पत्यांना धोंडिराम आणि विठ्ठल ही दोन मुले झाली.त्यात मोठा विठ्ठलचा जन्म दि.१ जुलै १९५३ रोजी आज रामतीर्थ(क.),ता.बसवकल्याण येथे तत्कालीन मागास(महार) जातीत झाला. हा परिवार कष्टकरी असून,वडील चिरेबंदी वाडे बांधकाम करायचे गवंडी कामात ते वाकबगार होते.प्रसंगी जमेल ती शेतीबाडीचीही कामेही करायचे.

कष्टकरी घराण्यात जन्मलेल्या विठ्ठल प्राथमिक शिक्षण भूतमुगळी ता.निलंगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत झाले. इयत्ता आठवी ते दहावी त्यांनी निलंगाच्या महाराष्ट्र विद्यालयातून पूर्ण केले. तर उच्च (बी.ए.)शिक्षण औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयातून झाले. तर तेथीलच मराठवाडा सांकृतिक मंडळ खडकेश्वर येथून त्यांनी बी.पी.एड. ची पदवी संपादन केली.विवाह हा प्ररत्येकाच्या जीवनातील एक महत्वाचा टप्पा आहे, विठ्ठल भोसले यांचे दि.२० मे १९८२ रोजी तगरखेडा येथील इयत्ता दहावी उत्तीर्ण असलेल्या शारदाबाईशी रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले.या दोघांना शिक्षणाविषयी प्रचंड आवड असल्याने त्यांनी आपली अपत्येही उच्च शिक्षित करण्याचा निर्धार केला. त्यांना रविकिरण हा मुलगा असून, तो एम.ए.इंग्रजी,एम.फ़िल,बी.एससी ऍग्री,पर्यंत शिक्षित आहे.लातूरमध्ये आठ वर्षे त्याने विजयपथ या नावाचे स्पर्धा परीक्षा केंद्र चालवून स्पर्धा परीक्षार्थींना सहकार्य केले. मुलगी वर्षाकिरण ही एम. एस्सी,बी.एड.,उषाकिरण ही एम.टेक,तर कविता भोसले हिने एमएसस्सी पीजीडीएमचे शिक्षण घेतले.या तिन्ही मुली विवाहित असून,त्या त्यांच्या सासरी सुखाने नांदत आहेत.

सेवेचा कालावधी

उच्च शिक्षण घेतल्यानंतर विठ्ठल भोसले हे नोकरीच्या शोधात होते. अशात त्यांना १९८१–८२ या वर्षांत पोस्ट बेसिक आश्रम शाळा चौका,ता.जि.औरंगाबाद येथे शिक्षक म्हणून सेवेची संधी मिळाली. दुसर्याच वर्षी त्याना उस्मानाबाद येथील प्रौढ शिक्षण विभागात पर्यवेक्षक पदावर सेवेत संधी चालून आली आणि तिथून त्यांच्या शासकीय सेवेचा प्रवास सुरु झाला. पुढे दि.३० मार्च १९८५ रोजी सहाय्यक प्रकल्प अधिकारी या पदावर बढती मिळाली. १८८६ ते १९८८ ही दोन वर्षे त्यांनी नांदेड येथे बदलीवर जावून काढली. १९८८ ते १९९० या दोन वर्षात त्यांना कार्य करता आले..१९९० ते १९९२ या दरम्यान त्यांनी मुरुड येथील शासकीय अध्यापक विद्यालयात सेवा बजावता आली. तर १९९२ ते १९९३ या वर्षात त्यांनी लातूर नगर पालिकेत शिक्षणाधिकारी पदाचा भार सांभाळला. १९९३ ते १९९४ या वर्षात लातूर जिल्हा प्रौढ शिक्षण विभागात ते कार्यरत होते.सन १९९४ ते १९९५ ह्या वर्षी उस्मानाबाद येथील शासकीय अध्यापक विद्यालयात सेवा केली. १९९४ ते १९९५ या साली ते मुरुडच्या शासकीय अध्यापक विद्यालयात कार्यरत होते. जून १९९५ ते ऑक्टोबर १९९८ या काळात त्यांनी काम केले तर नोव्हेंबर १९९८ ते जून २००३ नांदेड येथे सेवा राहिली. जुलै २००३ ते जुलै २००७ दरम्यान त्यांनी हदगाव .जि.नांदेड येथील शासकीय अध्यापक विद्यालयात सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून काम केले. जुलै २००७ ते मे २००८ मध्ये लूतरच्या प्रौढ शिक्षण विभागात ते सहाय्यक प्रकल्प अधिकारी या पदावर काम करत राहिले. जून २००८ ते ३० जून २०११ लातूर येथील निरंतर शिक्षण विभागात कार्यरत होते. आणि २९ वर्षाच्या निष्कलंक सेवेतून ते निवृत्त झाले.या सेवकाळात त्यांना शिक्षणाधिकारी पी.आर.मरेवार, कनिष्ट प्रशासन अधिकारी के.टी.लोसरवार,व्ही. एस.भालेराव,एम.आर.घाडगे,दत्ता शिंदे आदिंचे सहकार्य लाभले आहे,.

अनेकदा सन्मान

आपल्यावर सोपविलेल्या कामाची जबाबदारी पूर्ण बांधिलकीच्या सेवाभावातून करण्याची विठ्ठल भोसले यांची वृत्ती राहिलेली आहे.निव्यर्सनी,स्पष्टवक्त ा,अभ्यासू,कुटुंबवत्सल,सहकारी वृत्तीच्या त्यांच्या या निष्कलंक सेवेची वरिष्ठांनी वेळोवेळी दखल घेतली आहे. साक्षरता अभियानातील त्यांच्या कार्याबद्दल तत्कालीन प्रौढ शिक्षण संचालक चित्रा नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून विशेष कार्याबद्दल गौरविण्यात आले आहे. भारतीय शिक्षण संस्था पुणे येथे सेवांतर्गत प्रशिक्षण उत्तम प्रकारे केल्याबद्दल त्यांना विशेष सन्मानपत्र व प्रशस्तीपत्र देवून सन्मानीत केले गेले आहे.सन २००८ ते २०११ या तीन वर्षांच्या काळात त्यांनी केलेल्या विशेष सेवा कार्याबद्दल तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक गोविंद नांदेडे यांनी अतिउत्कृष्ट गोपनीय अहवालात देवून सन्मान केला तर शिक्षणाधिकारी दिलीप सहस्त्रबुध्दे यांनी पाठीवर कौतुकाची थाप मारली आहे.

अनेकांना सहकार्य

विठ्ठल भोसले म्हणजे न्यायाचं प्रतिक असं म्हणता येईल त्यांना या क्षेत्रातील शासन निर्णय व कायद्याचे परिपूर्ण ज्ञान आणि आकलन झाल्याने ते शिक्षण क्षेत्रातील अनेक अन्यायग्रस्तांना तन,मन,धनाने निर्धाराने पाठीशी उभे राहात आले आहेत. लातूर जि.प.तील उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सावंत यांना जातीय आकसाने कार्यालयात मारहाण करण्यात आली,त्यावेळी त्यांची पोलीस तक्रारही घेत नव्हते तेव्हा भोसले यांनी त्यात लक्ष घालून गुन्हा दाखल करायला भाग पाडले.मुखेड येथील हुतात्मा माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी रामदास थोटे हे अकाली मयत झाल्याने ,त्यांची पत्नी वैशाली थेटे या मागासवर्गीय विधवेस अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घ्यावे म्हणून सर्वोच्च न्यायालयापर्यत पाठपुरावा केला आणि न्याय मिळवून दिला.त्याचे परिणाम त्यांनी शिक्षण संस्थाचालकांकडून खोट्या खंडणीच्या केसमध्ये अडकविण्यात आले,त्यातूनही ते सहीसलामत निर्दोष निघाले.लातूरच्या पटेल चौकातील नूतन विद्यालयातील मयत कर्मचारी माणिकराव सगर यांच्या मुलाला तिथे अनुंकंपा तत्वावर सेवेत दाखल करुन घेण्यासाठी त्यांनी यशस्वी मदत केली. धुळाप्पा कल्याणी यांना बेकायदेशीर सेवासमाप्ती नंतरही परत सेवेत घ्यायला लावून पेन्शनर बनविले. विठ्ठल दामोदर गायकवा यांना पदोन्नती मिळवून देण्यात वाटा उचलला. बालिका भगवान कांबळे यांना सेवानिवृत्तीचे लाभ मंजूर करुन घेतले. खलंग्रीच्या फ़िनिक्स बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बालाजी कलवले यांचे सचिवपद अबाधित ठेवण्यासाठी कायदेशीर चौकटीत बसवून बहुमोल सहकार्य केले.ते आज सन्मानाने सचिवपद सांभाळत आहेत.

बोगस जात वाल्यांना दणका

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने बहुजन समाजासाठी आरक्षणाची संविधानात तरतुद केली,पण जातीचे बनावट खोटे प्रमाणपत्रं मिळवून आरक्षणाची उचलबांगडी करणारे लक्षात येवू लागले तेव्हा या विरोधात विठ्ठल भोसले पेटून उठले. त्यांनी अनुसूचीत जमातीची खोटी प्रमाणपत्रे मिळवत सेवा बजावणार्या ९ प्रकरणात आणि एका इतर मागासवर्गीय व्यक्तीचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे पाठपुरावा करुन अवैध ठरविले आहेत. उच्च वर्णीय रमेश तांबारे यांनी गोसावी जात प्रमाणपत्र घेवून सेवेचा लाभ उठवला होता. त्यात भोसलेंनी लक्ष घालून त्यांना धडा शिकवला. अशा अनेक प्रकरणांत शिक्षक,अधिकारी,कर्मचार्यांना मार्गदर्शन व सल्ला देण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

अनेकांप्रती आदर

आजपर्यंतच्या शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना तत्कालीन सीईओ भाई नगराळे, जिल्हाधिकारी प्रवीणसिंह परदेशी,शिक्षणाधिकारी आर.पी.गायकवाड, प्रा.डॉ.यु.टी.गायकवाड,प्रा.मोहन कांबळे,शिक्षण उपसंचालक दिलीप सहस्त्रबुध्दे,चंद्रमणी बोरकर,शिशिर घोनमोडे,शिक्षणाधिकारी राम गारकर,शिक्षण संचालक एम.आर.कदम,गणपत मोरे, बाळ होळीकर,ऍड.त्र्यंबकदास झंवर,प्रा.अभिनंदन जंगमे,अशोक यादवराव कांबळे तर न्यायालयीन कामामध्ये ऍड.रामराव बिरादार,ऍड.विजयकुमार चिखलीकर,ऍड.गुरुसिध्द मिटकरी,ऍड.शिवकुमार बनसोडे,ऍड.सुभेदार मादळे,ऍड.रुद्रवार,ऍड.पटवारी आदिंचे सहकार्य लाभल्याचे भोसले सांगतात.

बोगस तुकडी घोटाळा..

लातूर शिक्षणात देशात गाजले त्याचे नाव झाले पण या प्रकाशाच्या पाठीमागे खोटारडे पणाही लपला होता. लातूर मी मी म्हणार्या तथाकथित शिक्षण महर्षींनी व्यगपत झालेल्या शालेय तुकड्या शासकीय अधिकारी,कर्मचार्यांशी अर्थपूर्ण संधान बांधून बोगस आदेशाधारे त्या पुन्हा कार्यान्वित केल्या. यात भोसले यांनी लक्ष घातले आणि २६२ तुकड्या बोगस असल्याचे सिध्द झाले. नव्हे या प्रकरणात भोसले यांनी जनहित याचिका दाखल केली होती.त्याचा ३ ऑगस्ट २०१७ ला निकाल लागून,उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे भले भले माजी आमदार,खासदारांसह शिक्षण संस्थाचालक,मुख्याध्यापकांसह ३१५ जणांना आरोपी करण्यात आले.महाराष्ट्रातील हा एक मोठा बोगस तुकडी घोटाळा ठरला.यामुळे शिक्षण महर्षींची कर्तबगारी जाहिर झाली.समाजात नाचक्की झाली. अनेक अधिकार्यांवर त्यांच्या पगारातून शासनाचे पैसे परत करण्याचे आदेश झाले,लातूर जि.प.तील संतोष माने यांच्याकडून २ कोटी १६ लाख १६५ रुपये वसुलीचा समावेश आहे,तरीही त्यांना जि.प.ने पदोन्नती दिल्याबद्ल भोसले यांनी न्यायालयात दाद मागितली आहे.कालिदास माने यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण पदाचा राजीनामा देवून शिक्षक आमदारकीची निवडणूक लढविली,आणि पुन्हा स्वतःच्या शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक पदावर बसून शासन वेतन उचलले.यांची भोसले यांनी तक्रार केल्यामुळे माने यांना १२ लाख ७४ हजार ६५० रुपये शासनाकडे भरण्याची कारवाई झाली. ते हप्त्याने पैसे भरत आहेत.इंडिया नगरातील अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालयातील ५ कर्मचारी भरती घोटाळा प्रकरणी चिवट पाठपुरावा सुरु आहे.श्री देशिकेंद्र विद्यालयातील शिपाई स्नेहलकुमार खुडे याच्या बेकायदेशीर भरती प्रकरणात तक्रार केली त्यावर शिक्षण विभागाने चौकशी केली असता,खुडे यांनी यांनी न्यायालयात पळ काढला आहे.मुख्याध्यापक प्रभाकर बंडगर यांना माहिती राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद यांनी भोसलेच्या तक्रारीमुळे ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.योगवशिष्ट शिक्षण प्रसारक मंडळाच्या मुक्तेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता करण्यास भोसलेमुळे भाग पडले.नांदेड जिल्ह्यातील पाच कनिष्ठ महाविद्यालयांनी स्थलांतराचे नियम डावलून कारस्थान केले.त्यात भोसले यांनी लक्ष घातल्याने ती मान्यता रद्द झाली. मुक्तेश्वर मा. विद्यालयाची मान्यता रद्द करणे, श्रीमानयोगी प्रा.विद्यालयात व परिमल प्रा. व माध्यमिक विद्यालयातील बिंदू नामावली पूर्ण होणे संदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडे तक्रार करुन पाठपुराव्यात त्यांना यश मिळवले.श्रीमती सुशिलादेवी महाविद्यालयात सुनिता गिरवलकर यांना बेकायदेशीर दिलेल्या नियुक्तीवर आक्षेप घेवून आरक्षणानुसार तिथले प्राचार्य पद भरण्यास भाग पाडले.त्यांच्याकडून ५३ लाख ४८ हजार रुपये शासनाकडे जमा करावे लागले.मुरुडच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत अपंगाचे बोगस प्रमाणपत्र काढून लाभ घेणार्या बी.पी.शेख यांना २२ मे २०१२ रोजी सेवामूक्त व्हावे लागले. दिगंबर विठ्ठल ढवळे यांच्या बेकायदेशीर सेवासमाप्तीमध्ये लक्ष घातल्याने त्यांना दोन वर्षानंतर पुन्हा सेवेत घ्यावे लागले. त्यांना निवृत्ती वेतनही मंजूर झालेय.

खोट्या गुन्ह्यातून निर्दोष


शिक्षण क्षेत्रातील बोगस भरती,जात प्रमाणपत्रे, नियुक्त्यावर भोसले यांचे बारिक लक्ष असते,त्यांच्याकडे अन्यायग्रस्त मदतीसाठी येतात. अशाच एका प्रकरणात त्यांना खंडणीच्या गुन्ह्याला सामोरे जावे लागले.जांब बु.ता.मुखेड येथील नतीनिकेतन शिक्षण संस्थेचे तत्कालीन सचिव अनिल कोल्हे यांनी तोतया नामदेव खुडे यांना पुढे करुन भोसले विरोधात खंडणीचा देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला,त्यात देगलूर न्यायालयाने १९ एप्रिल २०२२ मध्ये निर्दोष मुक्तता केली आहे.बोगस तुकडी घोटाळ्यात भोसले मॅनेज होत नाहीत म्हणून काही शिक्षण संस्था चालकांनी पोलीसात खोट्या तक्रारी केल्या.ज्या सिध्द झाल्या नाहीत.

इतरही कामात रस

शिक्षण क्षेत्रातील सेवा व नंतरही अन्यायग्रस्तांसाठी झटणारे भोसले यांनी २०२२ पासून बाभळगाव नाका,लातूर येथे मुलगा रविकिरणसह राही ट्रॅक्टर्स चे शोरुम सुरु करुन शेतकर्यांना सहकार्य करीत आहेत.अनेक सामाजिक,शैक्षणिक व धम्म कार्यासाठी झटणार्या संस्था,व्यक्तींनाही भोसले यांनी आपल्या परिने हातभार लावला आहे.त्यांना पक्षी,प्राणी,वृक्षाचे प्रेम असल्याने ते पर्यावरणपुरक जगण्याचा प्रयत्न करतात.शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी,गैरव्यवहार प्रकरणी ते सातत्याने न थकता औरंगाबाद,पुणे, मुंबई असा प्रवास करत असतात,त्यासाठीचे तन,मन,धनाचे आणि वेळेचा होणार अपव्यय ते कधी भुर्दंड मानत नाहीत,ना कोणा दादाला भीक घालतात.विशेष म्हणजे घरचे खावून लष्काराच्या भाकरी भाजणच्या कामाला सहचारिणी शारदा,मुलगा रविकिरण यांनी कधीच त्यांना हे कशासाठी करता असे म्हटले नाही उलट प्रोत्साहन देत असतात.

इतरांना संदेश

विषयाचे आकलन करुन घेवून त्या अनुषंगाने संदर्भीय पुराव्या आधारे सक्षम प्राधिकार्यांकडे निःस्वार्थपणे न्यायासाठी दाद मागितल्यास निश्चित यश/न्याय मिळतो असा संदेश त्यांनी या सार्वजनिक क्षेत्रात काम करणार्यांसाठी संदेश दिला आहे.बोगस जातीच्या प्रमाणपत्राआधारे



सेवेचा लाभ घेणार्या विरोधात सामाजिक संघटना,नेते,कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे निष्ठेने काम केल्यास बोगसांची घुसखोरी होणार नाही,त्यासाठी मजबूत संघटन हवे,वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचा कोटा वाढला पाहिजे नव्हे आरक्षणाची पुनर्रचना होणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने मनःपूर्वक सदिच्छा!

–बाळ होळीकर
लातूर,९१७५१०३७६७

# लातूरचे नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी पदभार घेतला



लातूर जिल्ह्याचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून अमोल तांबे यांनी आज सोमवारी आपला पदभार स्वीकारला. नव्या पोलीस अधीक्षकांचे पोलीस प्रशासनाकडून स्वागत करण्यात आले. मावळते पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

लातूर जिल्ह्याचे मावळते पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची पुणे येथे बदली झाली आहे. लातूर जिल्ह्यात खूप समाधानकारक काम करता आले जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नागरीक, जिल्हा पोलीस दलातील अधिकारी/अंमलदारानी भरपूर सहकार्य केल्या बद्दल त्यांनी आपल्या निरोप समारंभात समाधान व्यक्त केले. लातूर जिल्ह्यात खूप चांगला अनुभव मिळाला खूप काही शिकता आले याबद्दल सोमय मुंडे यांनी आवर्जून उल्लेख केला.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने नूतन पोलीस अधीक्षकांचे स्वागत व मावळत्या पोलीस अधीक्षकांना निरोपाचा कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालयच्या मीटिंग हॉल मध्ये झाला. अपर पोलीस अधीक्षक डॉ अजय देवरे, पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे, यांचेसह लातूर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

लातूरकरांच्या सहकार्यामुळे अनेक चांगले उपक्रम लातूर जिल्ह्यात राबविता आले. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्याला चांगले सहकार्य दिले. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था, गुन्हेगारी कारवाया यावर वचक ठेवता आला, याबद्दल सोमय मुंडे यांनी समाधान व्यक्त केले.

# शिवसेना (उबाठा) जिल्हा सहसंपर्क प्रमुखपदी सी.के.मुरळीकर यांची नियुक्ती जाहीर

लातूर :- शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशावरुन लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते, विविध सामाजिक,धार्मिक संस्थांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेले कार्यकर्ते,राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, सी.के.मुरळीकर यांची लातूर ग्रामीण,उदगीर,अहमदपूर विभागाच्या लातूर जिल्हा सहसंपर्क प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.



सी.के.मुरळीकर हे अनेक वर्षांपासून निष्ठेने मुळ शिवसेनेचे कार्य करत होते.यापूर्वी त्यांनी बँक कर्मचारी शिवसेना महासंघाचे जिल्हा प्रमुख म्हणून सेवा केली आहे. व्यापारी आघाडी शिवसेनेचे ते जिल्हा सह समन्वयक राहिले आहेत.त्यांच्या कार्याची दखल घेवून आता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या लातूर जिल्हा सहसंपर्क प्रमुख म्हणून पक्षाकडून नियुक्ती करण्यात आली आहे.

सी.के.मुरळीकर यांच्या नियुक्तीबद्दल शिवसेना लातूर जिल्हा संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण, जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी,जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी,सह संपर्क प्रमुख नामदेव चाळक,महिला नेत्या सुनिता चाळक, कैलास पाटील, बाबासाहेब सोनवणे, एस.आर.चव्हाण,चंद्रकांत जाधव,विष्णुपंत साठे, डॉ. शोभा बेंजरगे, सुनील बसपूरे,बालाजी जाधव,भागवत वंगे, रवी कुरील,सोपान सातपुते, बस्वराज मंगरुळे, अनिल कबाडे, सोपान सातपुते,प्रा.खरटमोल,बालाजी शेरखाने आदिनी अनेकांनी मुरळीकर यांचे अभिनंदन केले आहे.

# आणिक आगार येथे छत्रपती शाहूजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

मुंबई प्रतिनिधी / के. एच. हनवते :- २६जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांची १५१ वी जयंती आणिक आगार उपहारगृह येथे मोठया थाटात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला -ढज श्री धायगुडे साहेब ,आर पी आय चे मुंबई अध्यक्ष श्री भागवत कांबळे साहेब,बेस्ट वर्कर्स युनियन चे धेंडे,श्रमिक उत्कर्ष सभेचे आणिक आगाराचे श्री सुनिल साळुंखे,निबांन न्यूज मीडिया दैनिक सारौभोम राष्ट्र प्रतिनिधी श्री विश्वास कांबळे साहेब, कराओके स्टार श्री अनिल सावंत , श्री सुरेश गुप्ता,श्री आनंद माने,श्री चंद्रकांत भिसे,श्री सिद्धार्थ अवसरमल,शशी तायडे,संदेश



उपाध्यक्ष श्री दत्ता शिंदे साहेब,वैद्यकीय अधिकारी श्री गोसावी साहेब,संयुक्त जयंती उत्सव समितीचे आणिक आगराचे कार्यध्यक्ष श्री बाबू गायकवाड साहेब,बेस्ट जागृत कामगार संघटनेचे अँड. श्री संजय गायकवाड साहेब,अध्यक्ष श्री मधुसूदन कांबळे,राहुल बिरारी,निलेश गरुड,तुषार गायकवाड, ज्ञानेश्वर ओव्हाळ, ढोबळे गुरुजी, आणि सर्व कामगार उपस्थित होते कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला

# प्राध्यापक गोविंद पडिले व दयानंद इटूबोने यांचा सेवापूर्तीनिमित्त, अनंतपाळ नूतन माजी विद्यार्थी फाऊंडेशन १९९९ यांच्या वतीने सत्कार

लातूर :- दि. ३०/०६/२५ रोजी श्री अनंतपाळ नूतन विद्यालय शिरूर आनंतपाळ येथील वरिष्ठ प्राध्यापक गोविंद पडिले व दयानंद इटूबोने नियत वयोमानानुसार ३० वर्ष अविरत सेवा देऊन सेवानिवृत्त झाले. त्यांच्या या सेवपूर्तीनिमित्त श्री अनंतपाळ नूतन महाविद्यालय शिरूर अनंतपाळ येथे सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, शिवनेरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नारायण सूर्यवंशीहे होते तर प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष मा. श्री जगताप एन. एस. सचिव मा. श्री प्रभाकरराव कुलकर्णी गुरुजी, सर्व संचालक, प्राचार्य श्री शिवाजी मादलापुरे, सर्व आजी माजी शिक्षक व उच्च महाविद्यालयाचे प्राध्यापक यांच्यासह श्री ऋषिकेश बद्दे व इतर मान्यवर तसेच दोन्ही प्राध्यापक यांचा मित्र परिवार, नातलग उपस्थित होते.



यावेळी विविध मान्यवरांनी प्राध्यापक श्री गोविंद पडिले व श्री दयानंद इटूबोने यांच्या बद्दल विचार मांडले. या कार्यक्रमादरम्यान, श्री अनंतपाळ नूतन माजी विद्यार्थी फाऊंडेशन १९९९ यांच्या वतीने श्री गोविंद पडिले व श्री दयानंद इटूबोने यांचा त्यांनी केलेल्या दीर्घ शिक्षण सेवाकार्या साठी सन्मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच, श्री अनंतपाळ नूतन माजी विद्यार्थी फाऊंडेशन १९९९ च्या सचिव व माजी विद्यार्थी श्रीमती सुमित्रा तोटे यांनी महाविद्यालयात प्रवेश केल्यापासून उत्तीर्ण होईपर्यंत तत्कालीन प्राध्यापकांनी श्रीमती सुमित्रा तोटे यांच्यासह दैठणा येथील त्यांच्या सोबत शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या बसचा पास, तसेच वह्या पुस्तकांचा खर्च त्यांच्या पगारातून निधी संकलित करून उपलब्ध करून दिल्यामुळे अनेक मुलीना शिक्षण घेता आले. श्रीमती सुमित्रा तोटे, श्री नागनाथ तोंडारे या माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट असूनही केवळ या प्राध्यापकाचे सहकार्य व आर्थिक पाठबळामुळे शिक्षण पूर्ण करू शकलो व आज चांगल्या स्थितीत नोकरी करत आहोत हे सांगून सर्व प्राध्यापक, संस्था व संस्थाचालक यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार शिक्षक श्री भोसले यांनी केले.

# शाहू महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप





लातूर :- लातूर शहरातील मेघराज नगरात कांहीं हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना मागासवर्गीय विभाग,शहर जिल्हाध्यक्ष संजय सोनकांबळे यांच्या नेतृत्वात त्यांच्या सहकारी सचिन दाने,जिल्हाप्रमुख,लातूर ,ज्येष्ठ शिवसैनिक विष्णू साबदे,विशाल देवकते,शामराव सूर्यवंशी,जयश्री भुतेकर,प्रगती डोळसे,प्रशांत माने,सफाई कामगार महाराष्ट्र राज्य समन्वयक सज्ञा द शेख,सुमित्रा बनसोडे,सतीश गायकवाड,राजाभाऊ बनसोडे, सुनील डोळसे,इत्यादी उपस्थित होते याप्रसंगी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरवात झाली.मग लोकराजा राजर्षी शाहु महाराजाना पुष्पहार घालून वंदन केले.प्रथम अध्यक्ष पुण्याचा शाल फुलहार देऊन सत्कार केला.हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य वाटप केले.मग जिल्हाप्रमुख सचिन दाने,विष्णू साब्दे,अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले,प्रास्ताविक संजय सोनकांबळे यांनी केले.यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

केज/प्रतिनिधी यरावंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, आंबाजोगाई येथून मे-जुन २०२५ घेण्यात आलेल्या बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स( ग्रंथालय व माहिती शास्त्र) पदवी परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे ६८.३० टक्के गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.



आनंद वसुदेव गायकवाड हे स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज जि. बीड मध्ये कार्यरत आहेत. आनंद वसुदेव गायकवाड यांनी गंथालय व माहिती शास्त्र बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स मध्ये ६८.३० टक्के गुण घेवून उत्तीर्ण झाल्याबद्दल आंबाजोगाई सेंटरचे संचालक डॉ. पी. सी. गादेकर, डॉ. मधुबाला, प्रा.डॉ. आशा गायकवाड, प्रा. डॉ. मुंडे, प्राध्यापक वृंद तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीडचे संस्थापक अध्यक्ष, प्रचार्य, डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड, उपाध्यक्ष - मुरलीधर शिंदे, सचिव - सौ. छायाताई सोमवंशी, सहसचिव -ज्ञानोबा भोगजकर, सदस्या सौ. सुमनताई गायकवाड, तसेच मित्रपरिवारांकडून आनंद गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.

# महामार्गावरील अतिक्रमणे काढा; अपघातस्थळी रूग्णवाहिका तातडीने पाठवा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना सुचना

बीड/प्रतिनिधी जिल्ह्यात विविध रस्त्यावर ब्लॅकस्पॉट आहेत. शिवाय राष्ट्रीय महामार्गावर अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे अपघात होत असून अपघात टाळण्यासाठी अतिक्रमणे काढा आणि अपघातस्थळी तातडीने रूग्णवाहिका पाठवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजीत केली होती. यावेळी खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अपघाताचे प्रमाण हे सायंकाळी व पहाटे जास्त असते. या दरम्यान आपल्या यंत्रणेने सतर्क राहायला हवे. जिल्ह्यात अनेक असे अतिक्रमण आहेत, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. ते अतिक्रमण काढण्याचा सूचना केल्या. विशेषत: गेवराई तालुक्यातील गढी भागात अनेक वेळा अपघात झालेले आहेत. त्या ठिकाणी तांत्रिक सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. जिल्ह्यात कोठेही अपघात झाला तर त्या ठिकाणी रुग्णहिका तात्काळ मिळावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सूचना केल्या. माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे असे म्हणत, लोकांची अडवणूक होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला. दरम्यान, तेलगाव या ठिकाणी रस्त्याचे पाणी व्यवस्थित न काढल्यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. ते दुरुस्ती करण्यात यावे. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे स्वतंत्र ऑफिस बीड जिल्ह्यात होण्यासाठी आर.ओ ऑफिसला प्रस्ताव पाठवा, अशा सुचना देखील दिल्या. राष्ट्रीय महामार्ग संस्थेचे स्वतंत्र




कार्यालय बीडला झाल्यास जिल्ह्यातील कामे वेळेत मार्गी लागतील, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी -गढी- माजलगाव या महामार्गावरील तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा व इतर सर्व ठिकाणी रस्ते कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे अपघात होत असले बाबत तक्रारी होत आहेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, असेही म्हटले.

'टॉप फाईव्ह' विषयांना घातला हात

१. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४५८ डी व ४५८ सी या रस्त्यावरील प्रमुख शहराभोवती नवीन बायपास/ओव्हर ब्रिजेस (अंबाजोगाई -केज- नेकनुर-मांजरसुंबा-पाटोदा व माजलगाव शहर) करणे. या रस्त्यावरील अपघात होत असलेल्या भागातील दुरुस्तीची कामे तातडीने करणे.

२. पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव -केज- मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी वाहतुकीचा करणे. अंबाजोगाई शहरात यशवंतराव चव्हाण चौकामधे इलेव्हेटेड पादचारी मार्ग तयार करणे.

३. राष्ट्रीय महामार्ग सुरत-चेन्नई साठी संपादन करणे आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती बाबत सविस्तर चर्चा केली.

४. रामा ५४८ माजलगाव- धारूर -केज या रस्ता कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे तेथे दररोज अपघात होत आहेत. संबंधित एजन्सी कडून तातडीने आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्यात याव्यात. बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरी रस्ता करणे बाबत निविदा प्रक्रियेला वेग द्यावा.

५. ऋपाटोदा व आष्टी तालुक्यातील पिंप्री-अंमळनेर-टाकळी काजी हा रस्ता तसेच गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा -उमापूर-शेवगाव हे दोन्ही रस्ते राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात यावा.

पालखी मार्गाचे काम निकषाप्रमाणे पुन्हा करावे पैठण- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील डोंगरकिन्ही ते पारगाव घु.(अनपटवाडी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब आहे. तसेच मळेकरवाडी घाटातील डांबरीकरणाचे काम वारंवार सूचना देऊनही अद्याप सुरु झालेले नाही. या रस्त्याच्या संपूर्ण कामात जागोजागी मोठ-मोठ्या भेगा पडलेल्या आहेत त्यामुळे रोज दुचाकी/चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. पाटोदा शहरातील रस्ता काम अपूर्ण आहे. संपूर्ण रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील निकषाप्रमाणे प्रमाणे पुन्हा करून घेण्यात यावे. एजन्सीवर आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करावी. अतिरिक्त बाब या नावाने करण्यात आलेल्या अनावश्यक खर्चाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे खा.सोनवणे यांनी म्हटले.

# 'आम्हाला एक चांगला, सुंदर करार करायला..' ; भारत-अमेरिका करारावर निर्मला सीतारमण यांचे मोठे विधान

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताच जगभरात परस्पर शुल्क लादून खळबळ उडवून दिली. परंतु कर युद्धाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आणि वेगवेगळ्या देशांच्या सरकारांशी वाटाघाटी झाल्यानंतर, या शुल्काच्या अंमलबजावणीची तारीख वाढवण्यात येऊन ट्रम्प यांनी काही काळासाठी दिलासा दिला.

भारतासाठी परस्पर शुल्काची अंतिम मुदत ९ जुलै होती. आता अमेरिकेचा परस्पर शुल्क टाळण्यासाठी ९ जुलैची अंतिम मुदत जवळ येत असताना, भारत सरकारने जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेशी एक निर्बाध करार करण्याचे संकेत दिले आहेत. परंतु त्याच वेळी, भारतातील शेतकरी आणि पशुपालकांचे सर्वोत्तम हित सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या लाल रेषा आखण्याची स्पष्ट वचनबद्धता देखील व्यक्त केली आहे.

अमेरिकेसोबत भारतीय बाजारपेठा 'उघडा' करेल राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात नवी दिल्लीसोबतचा अंतरिम द्विपक्षीय व्यापार करार (बीटीए) भारतीय बाजारपेठ अमेरिकेसाठी 'उघडा' करेल या विधानावर प्रतिक्रिया देताना, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी हो, आम्हाला एक मोठा, चांगला, सुंदर करार करायला आवडेल का नाही? असे म्हटले आहे.

एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या मुलाखतीत अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या, आपण ज्या टप्प्यावर आहोत, आणि २०४७ पर्यंत विकसित भारत बनण्याची आपली विकासाची उद्दिष्टे आणि महत्त्वाकांक्षा पाहता, मजबूत अर्थव्यवस्थांसोबत आपण जितक्या लवकर असे करार करू तितकेच ते आपल्याला चांगले सेवा देतील. अर्थमंत्र्यांच्या मते, कृषी आणि दुग्धव्यवसाय ही खूप मोठ्या लाल रेषांपैकी एक आहे जिथे अमेरिकेसोबत वाटाघाटी दरम्यान उच्च पातळीची खबरदारी घेतली गेली आहे.

खाजगी गुंतवणूक वाढत खाजगी क्षेत्राकडून गुंतवणुकीत मंदावल्याच्या कथित घटनेवर, त्या म्हणाल्या की, गोष्टी चांगल्यासाठी बदलू लागल्या आहेत. किमान गेल्या सहा महिन्यांत, खाजगी गुंतवणूक आणि क्षमता विस्तार होत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत खाजगी कंपन्यांकडे निश्चितच अतिरिक्त रोख रक्कम आहे आणि त्या कदाचित निष्क्रिय उत्पन्न मिळवत आहेत. परंतु आपल्याला बदलाची चिन्हे दिसत आहेत. शहरी मंदी दूर करण्यासाठी सरकार काय करणार आहे असे विचारले असता, सीतारमण म्हणाल्या की, भावना निश्चितच बदलत आहे. एप्रिलपासून, (सकारात्मक ग्राहक) भावना (आयकर सवलतींमुळे) स्पष्टपणे दिसून येत आहेत, ती म्हणाली.

अणुऊर्जेमध्ये खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे सीतारमण यांनी अर्थव्यवस्थेला संरचनात्मक चालना देण्यासाठी लवकरच आणल्या जाणाऱ्या दुसऱ्या पिढीतील सुधारणा ची रूपरेषा मांडली, ज्यामध्ये बँकांना चांगल्या स्थितीत आणणे आणि अणुऊर्जेमध्ये खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे समाविष्ट आहे. दर आणि स्लॅबच्या आठ वर्षांच्या व्यापक अप्रत्यक्ष कर पुनर्रचनेचा भाग म्हणून, भारित सरासरी वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सध्याच्या पातळींपासून खाली येऊ शकतो असेही त्यांनी सूचित केले.

त्यांनी व्यापारी निर्यातीला अतिरिक्त आधार देण्याची गरज अधोरेखित केली, काही अंतर्निहित राज्य आणि स्थानिक कर असलेल्या निर्यात केलेल्या उत्पादनांमधील कर सामग्री अद्याप पूर्णपणे निष्प्रभ केलेली नाही हे निदर्शनास आणून दिले. निश्चितपणे, आम्ही जमीन आणि मालमत्ता चलनीकरणाव्यतिरिक्त सुधारणांच्या विविध आयामांकडे पाहत आहोत, ती म्हणाली, राज्यांनी उत्सुकतेने स्वीकारलेल्या तीन कामगार संहितांवर एकही पाऊल मागे हटणार नाही.

बँका कर्ज स्वस्त करण्याचा प्रयत्न करतील अलीकडेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रमुखांना कामगिरीचा आढावा घेण्यासाठी भेटलेल्या सीतारामन यांनी कबूल केले की त्यांचे ठेवींचे दर पूर्वीइतके वाढत नाहीत. बँकर्सनी उचललेल्या कठोर पावलांचा उल्लेख करत त्या म्हणाल्या, बँकांकडून हे सुधारण्यासाठी काही प्रयत्न केले जातील, कारण लोकांना कर्जे स्वस्त व्हावीत आणि ठेवींपेक्षा चांगले परतावे मिळावेत अशी लगेच इच्छा असते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE